सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४२ | शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,५०,०००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,३९,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१६,२००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३६०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन



प्रा. अशोक पवार
ज्येष्ठ नेते, अमळनेर



सौ. भारतीताई सोनवणे
सदस्य : भाजप राज्य परिषद (महा)



डॉ. दिनेश पवार
अमळनेर



श्री. हरिओम अग्रवाल
युवा नेता



श्री. रोशन साळुंखे
शिक्षक

# भटके विमुक्त समाजाच्या हक्कांसाठी एकजुटीचा निर्धार!

## अमळनेरमध्ये हक्क व मुक्ती दिनानिमित्त सामाजिक प्रबोधन
## शिक्षण, घरकुल, जातीचे दाखले व शासकीय योजनांच्या प्रश्नांवर चिंतन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भटके विमुक्त जाती समन्वय समितीच्या वतीने नांदेडकर सभागृह येथे ३१ ऑगस्टचा ऐतिहासिक भटके विमुक्त हक्क आणि मुक्ती दिन सामाजिक प्रबोधन व चिंतनाने साजरा करण्यात आला. यावेळी भटके विमुक्त समाजाच्या हक्कांसाठी संघटित होऊन मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन मान्यवरांनी उपस्थित सामाजिक कार्यकर्ते व समाजबांधवांना केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, ३१ ऑगस्ट १९५२ रोजी जाचक गुन्हेगारी जमाती कायदा रद्द झाल्याने भटके विमुक्त समाज खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण करत अमळनेर येथे समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासह विविध प्रश्नांवर चिंतन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते प्रा. अशोक पवार व डी. ए. धनगर यांनी भटके विमुक्त समाजाच्या हक्कांसह शैक्षणिक प्रगतीवर आणि समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासावर भर दिला. समाजातील तरुण-तरुणींनी बदलत्या काळानुसार आधुनिक व कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी, असे आवाहन अमळनेर अर्बन बँकेचे संचालक रणजित शिंदे यांनी केले. भटक्या विमुक्त जाती विकास हक्क परिषदेचे अमर कटोले यांनी शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित प्रश्न, जातीचे दाखले, हक्काचे घरकुल आणि वसतिगृहांच्या सुविधांबाबत मार्गदर्शन केले. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याचे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष बन्सीलाल भागवत यांनी केले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय भोई, सेवानिवृत्त अधिकारी सी. एस. वैद्य, माजी सिनेट सदस्य दिनेश नाईक, युवासेनेचे शहराध्यक्ष राहुल कंजर, विजय पाटील, एस. सी. तेले, प्रकाश ताडे, मुकेश परदेशी, बापू भोई, मनोहर सोनवणे, सुभाष जाधव, सामाजिक व शिक्षक कार्यकर्ते डी. ए. पाटील, वीरभूषण पाटील, दशरथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.





कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल वासुदेव जोशी गोंधळी समाजाचे पदाधिकारी विलास दोरकर, नारायण शिंदे, रोहित भोपे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सामाजिक कार्यकर्ते मनोज शिंगणे, दिपक भोई आणि राहुल कंजर यांचाही सत्कार करून गौरव करण्यात आला. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता सूत्रसंचालक तथा सामाजिक कार्यकर्ते सुनिल भोई यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी भटके विमुक्त समाजातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी भविष्यात सामाजिक प्रश्नांवर एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मातोश्री नगरात चोरट्याचा धिंगाणा!

## पकडणाऱ्याच्या बोटाला चावा घेत तोडला तुकडा;
## अवघ्या तासाभरात अमळनेर पोलिसांनी संशयिताला घेतले ताब्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील मातोश्री नगर परिसरातील चामुंडा माता मंदिराजवळ बांधकामाच्या ठिकाणी साहित्य घेऊन जाण्याच्या संशयावरून नागरिकांनी एका व्यक्तीला अडवले असता त्याने केलेल्या झटापटीत एका नागरिकाच्या बोटाला गंभीर दुखापत झाली. संशयिताने बोटाला चावा घेतल्याने बोटाचा काही भाग तुटल्याची घटना २ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ६ वाजता घडली. दरम्यान, घटनेनंतर पोलिसांनी अवघ्या तासाभरात संशयिताचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.



मातोश्री नगरातील चामुंडा माता मंदिराजवळ सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणाहून एक व्यक्ती बांधकाम साहित्य घेऊन जात असल्याचे विजय बडगुजर व रमेश पाटील यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्याला हटकून विचारणा केली असता, 'मला मिस्त्रीने पाठवले आहे,' असे त्याने सांगितल्याची माहिती आहे. मात्र, त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने नागरिकांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला.

यावेळी झालेल्या झटापटीत संशयिताने विजय बडगुजर यांच्या हाताच्या बोटाला जोरदार चावा घेतला. यात त्यांच्या बोटाला गंभीर दुखापत झाली असून बोटाचा काही भाग तुटल्याने त्यांना तातडीने धुळे येथे उपचारासाठी हलविण्यात आले. तेथे त्यांच्यावर

पान २ वर

### एसटी ने प्रवास करणाऱ्या महिलांसाठी आनंदाची बातमी

# NCMC कार्ड नसलेल्यांनाही मिळणार ५० टक्के सवलत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटी महामंडळाकडून प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सलवत देण्यात येते. विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारने महिलांसाठी प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सूट देण्याची घोषणा केली होती.





त्यानुसार आता महिला तसेच ज्या वृद्ध व्यक्तींचे ६५ हून अधिक वय आहे, अशा प्रवाशांना एसटी भाड्यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येते. पण, अलीकडच्या काळात सरकारने एसटीचा हा लाभ मिळवण्यासाठी नवा नियम लागू केला. त्यामुळे आता ५० टक्के योजनेचा लाभ घेण्यासाठी NCMC कार्डची सक्ती करण्यात आली. १ सप्टेंबर २०२६ पर्यंत देण्यात आली होती. याबाबत आता नवीन घोषणा करण्यात आली आहे.

माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी बुधवारी एक मोठी घोषणा केली. NCMC कार्डच्या सक्तीवरून ते म्हणाले की, "शासन निर्णयानुसार ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एसटी बसमधून प्रवास करताना NCMC कार्डची सक्ती करण्यात आली आहे. कार्ड नसल्यास पूर्ण तिकीट आकारले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. ऐन गौरी-गणपती उत्सवाच्या काळात भाविक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून NCMC कार्डची सक्ती तात्पुरती करू नये असे निर्देश दिले आहेत. अशी मोठी घोषणा त्यांनी यावेळी केली.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# अंबरीष टेकडीवरील गैरप्रकारांना पोलिसांचा दणका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अंबरीष महाराज टेकडीवर प्रेमी युगुलांकडून होणारे अश्लील चाळे तसेच त्यांचे फोटो व व्हिडीओ काढून ब्लॅकमेल करणाऱ्या टवाळखोरांचे प्रकार रोखण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी महिला पोलीस कर्मचाऱ्यांसह दामिनी पथकाला टेकडीवर नियमित गस्त घालण्याचे आदेश दिले आहेत.

अंबरीष महाराज टेकडीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण झाल्याने परिसर ऑक्सिजन पार्कसारखा हिरवागार झाला असून दाट जंगलही वाढले आहे. त्यामुळे निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी सकाळी व सायंकाळी फिरायला येणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे. तसेच पर्यटनस्थळ म्हणूनही नागरिक टेकडीला भेट देत असतात.

मात्र, या दाट जंगलाचा गैरफायदा घेत शहर, तालुका तसेच बाहेरगावातील काही प्रेमी युगुले दुपारच्या वेळी टेकडीवर येऊन अश्लील चाळे करत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे येत होत्या. त्याचवेळी परिसरातील काही टवाळखोर तरुण या युगुलांचे

पान २ वर

### दारूच्या नशेत पोलिसांनाच धमकावण्याचा प्रयत्न; एकावर गुन्हा

दरम्यान, एका मिरवणुकीत दारूच्या नशेत धिंगाणा घालत पोलीस उपनिरीक्षकांना धमकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या एकाला पोलिसांनी चांगलाच दणका दिला. राधे प्रेमराज महाजन (रा. माळीवाडा, अमळनेर) हा पवन चौकात सार्वजनिक ठिकाणी दारूच्या नशेत गोंधळ घालत होता. त्याला समजावण्यासाठी गेलेल्या पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड यांना त्याने धमकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत कारवाई केली. याप्रकरणी मयूर पाटील यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम २२४, महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ८५ (१) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ११२ व ११७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल प्रमोद पाटील करीत आहेत.

अभीष्टचिंतन



आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि यशाची नवनवी शिखरे प्राप्त होवोत,

युवा शक्तीला नवी दिशा देत, समाजहितासाठी सदैव तत्पर राहणाऱ्या

हरीओम विनोद अग्रवाल

यांना वाढदिवसाच्या 'मंगलमय' शुभेच्छा!

शुभेच्छुक
सतिष एंटरप्रायझेस
कॉटन मार्केट, अमळनेर

# गोकुळाष्टमीनिमित्त गोशाळेत गोसेवेचा भक्तिमय सोहळा

## श्रीमती भानुबेन बाबुलाल शहा गोशाळेत आज विशेष कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भगवान श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचे प्रतीक असलेल्या गोकुळाष्टमीनिमित्त अमळनेर येथील पळासदळे रोडवरील श्रीमती भानुबेन बाबुलाल शहा गोशाळेत गोसेवा, गोमाता पूजन व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

गोकुळाष्टमीचे औचित्य साधून या वेळी गोमातेची विधिवत पूजा-अर्चा



व सेवा करण्यात येणार आहे. भारतीय संस्कृतीतील गोसेवेचे महत्त्व अधोरेखित करून गोसेवा, करुणा आणि सेवाभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.

उद्योजक तथा गोसेवक गोविंद अग्रवाल आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज गार्डन ग्रुप यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने भक्ती, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा संगम या उपक्रमातून साधला जाणार आहे. गोमातेची सेवा ही श्रद्धा, करुणा आणि सेवाभावाचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे नागरिकांनी या पवित्र उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन गोसेवेचा आनंद घ्यावा आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

### आपल्यानंतर आपल्या माणसांचे कसे?

माणसाचा जीवनप्रवास पहिल्या श्वासापासून सुरू होऊन शेवटच्या श्वासापर्यंत असतो. आपण हयात असताना आपल्याला आपली आणि जास्त आपल्या कुटुंबीयांची काळजी असते. माणसाचा शेवट झाला की त्याची ह्या जगातून एक्झिट होते, आपल्या माणसांशी कनेक्शन तुटून व्यक्ती एका वेगळ्याच जगात जाते, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. पण तरीही माणसाच्या मनात हा प्रश्न, ही काळजी उरतेच की, आपल्यानंतर आपल्या माणसांचे कसे? खरंतर असा प्रश्न, अशी काळजी का वाटते ह्यावर विचार केला तर असे लक्षात येते की माणूस मुळातच भावनाप्रधान, समाजप्रिय, कुटुंबवत्सल प्राणी आहे. त्यामुळे आपल्या मागेही आपले कुटुंब सुखात रहावे, काळजीत राहू नये ह्यासाठी त्याची सगळी धडपड असते. ह्यासाठीच तो हयात असतानाच कुटुंबासाठी त्यांची सोय लाऊन ठेवतो, तरतूद करून ठेवतो. ह्यासाठी अभ्यास करून तो निरनिराळे पर्याय निवडतो. ह्या अनेक पर्यायांपैकी एक पर्याय म्हणजे विमा, याने की इन्शुरन्स.मराठीत 'विमा' म्हणजे 'इन्शुरन्स'. ह्याचा सोप्या भाषेत अर्थ भविष्यातील संभाव्य आर्थिक नुकसानापासून स्वतःचे किंवा आपल्या कुटुंबाचे, आपल्या मालमत्तेचे संरक्षण मिळवण्याचा करार असा होतो.विमा म्हणजे नेमके काय? तर हा एक कायदेशीर करार असतो. ह्यात विमा कंपनी आणि ग्राहक ह्यांच्यात देवाणघेवाण होते. ग्राहक दरमहा किंवा वर्षभराने ठराविक रक्कम (प्रीमियम) भरतो. भविष्यात मृत्यू, अपघात, आजार किंवा नुकसान झाल्यास विमा कंपनी आर्थिक भरपाई देते.

माणसाला सगळ्यात प्रिय आपला आणि आपल्या जवळच्या माणसांचा जीव. म्हणून पहिला प्रमुख विम्याचा प्रकार म्हणजे "जीवन विमा". व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा मुदत संपल्यावर कुटुंबाला मिळणारा आर्थिक आधार. दुसरा "आरोग्य विमा", ह्यात आजारपणात किंवा उपचारादरम्यान हॉस्पिटलचा खर्च भागवण्यासाठी मदत मिळते. अजून एक प्रकार म्हणजे "वाहन विमा". वाहन चोरीला गेल्यास किंवा अपघात झाल्यास होणाऱ्या नुकसानाची भरपाई. भारत कृषिप्रधान देश असल्याने अजून एक अतिशय महत्वाचा विमा प्रकार म्हणजे "पीक विमा". नैसर्गिक संकटामुळे पिकांचे नुकसान झाल्यावर शेतकऱ्यांना मिळणारी मदत.काही वर्षांपूर्वीचा काळ आणि आत्ताचा काळ ह्यात अगदी जमीनआसमानचा फरक पडलाय. हा फरक सुबत्ता, तंत्रज्ञान, विकास ह्याबरोबरच हवामान आणि माणसाची प्रकृती ह्यात पण पडलाय. पूर्वी इतकी सहनशक्ती सुध्दा हल्ली राह्यली नाही ही वस्तुस्थिती. पूर्वी मस्त मोकळे हवामान आणि दणदणीत शारीरिक कष्ट ह्यामुळे आरोग्य उत्तम राहात असे. पूर्वी तब्येत बिघडली की आधी घरच्या घरी आजीबाईच्या बटव्यातील औषधे मिळायची आणि जरा जास्त बरं नसलं की मग जनरल डॉक्टर. आता मात्र आपण सरळ स्पेशालिस्टकडेच धाव घेतो, कारण आपल्याला असलेली आपल्या तब्येतीची, प्रकृतीची काळजी. माणसाला सगळ्यात प्रिय स्वतःचा आणि स्वतःच्या माणसांचा जीव. सिर सलामत तो पगडी पचास हे वाक्य सरसकट सगळ्यांना मान्य. त्यामुळे आपल्या जीविताची जो काळजी वा हमी घेतो तो आपल्याला प्रिय. जर ही काळजीवाहू व्यक्ती असेल तर ती व्यक्ती प्रिय आणि ती जर एखादी कंपनी वा संघटना असेल तर ती आपल्याला निःसंशय मान्य वा मनापासून पटलेली.आता काळ खूप बदललाय. आता आपल्या तब्येतीची काळजी घेणाऱ्या, आजारपणात मदतीचा हात पुढे करणाऱ्या अनेक कंपन्या आल्यात, पण पूर्वी आमच्या मनावर ठसलेलं एकच घोषवाक्य होतं, "जिंदगी के साथ भी, जिंदगी के बाद भी.""जिंदगी के साथ भी, जिंदगी के बाद भी" हे वाक्य आठवल्याबरोबर चटकन नजरेसमोर एल.आय.सी. येते. पूर्वी नानाविध विमा कंपन्या नव्हत्या, त्यामुळे तेव्हा विमा म्हणजे फक्त आणि फक्त "एल.आय.सी." हे आणि हेच समीकरण डोक्यात फीट बसलं होतं. आता मात्र वेगवेगळ्या फायदेशीर योजना घेऊन खूप साऱ्या कंपन्या ह्या विमाक्षेत्रात उतरल्या आहेत. माणसाचं जीवन किती क्षणभंगुर आहे ह्याची जेव्हा माणसास जाणीव झाली तेव्हा माणूस खरा मुळापासून हादरला आणि आपल्या जिवीताची काळजी घेण्याची संकल्पना त्याच्या डोक्यात ठसली. कुटुंबातील एखादी व्यक्ती जरी गमावली तरी त्या कुटुंबाची किती अपरिमीत हानी होते हे समजल्यावर माणूस जरा आपल्या प्रकृतीकडे जास्तच लक्ष देऊ लागला, तब्येतीची काळजी घेऊ लागला.कुठलाही आजार अचानक उद्भवल्यावर पैशाची जमवाजमव करण्यासाठी, सोय लावण्यासाठी करावी लागणारी धावपळ काळजी ह्या विम्या कंपन्यांनी काही प्रमाणात कमी केलीय हे नक्की.पूर्वी कुटुंबातील कुटुंबप्रमुखाला जर एखादा जीवघेणा आजार झाला तर तो कुटुंबप्रमुख आजारापेक्षाही काळजीने तीळ तीळ मरायचा. आपल्या मागे आपल्या परिवाराचे कसे होईल, आपलं अख्खं कुटुंब आपल्यामागे कसं सावरेल ही विवंचना त्याला खात होती.

अर्थात माणूस गेल्यानंतर त्याची कमतरता, उणीव ही कशानेच भरून निघत नाही. पण हां, जाणाऱ्याची घरच्यांबद्दलची भविष्याची चिंता काही प्रमाणात का होईना कमी होते. आपल्यामागे आपली लोक ही आर्थिक बाबतीत तरी सक्षम राहतील ही जाणीव कुठेतरी त्याला समाधान देते.मी स्वतः आरोग्याची अजिबात चिंता नसलेली वल्ली. अर्थात हा माझ्यातला दोषच. स्वतःला दिवसभर खूप बिझी ठेवणे आणि फक्त दणदणीत कामं करणे हा माझा फंडा. काळजी वगैरे कोसो दूर. माझी काळजी घ्यायचा कॉंट्रॅक्ट त्या भगवंताला दिलाय. त्यामुळे त्यालाच बिचाऱ्याला माझी प्रकृतीबद्दलची अनास्था बघून काहीतरी करणे भागच होते. म्हणून त्याने माझ्या बँकेमार्फत माझी व माझ्या कुटुंबाची विम्याची सोय केली.एल.आय.सी. ही भारत देशातील सर्वात मोठी विमा कंपनी आहे. ही कंपनी पूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची आहे. 1818 मध्ये ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कंपनी ही भारतात जीवनविमा व्यवसाय सुरू करणारी पहिली विमा कंपनी. 1928 मध्ये भारतातील जीवन तसेच इतर विम्यांची सांख्यकीय माहिती गोळा करता यावी, यासाठी भारतीय विमा कायदा संमत करण्यात आला. 1956 मध्ये विमा सेवा आणि निधी सेवा पुरविणाऱ्या सुमारे 245 भारतीय तसेच परकीय कंपन्या भारत सरकारने ताब्यात घेऊन त्यांचे राष्ट्रीयकरण केले. 19 जून 1956 ला संसदेत एल.आय.सी. कायदा संमत करून वरील कंपन्यांच्या एकत्रीकरणातून 1 सप्टेंबर 1956 ला "एल.आय.सी." ची स्थापना करण्यात आली. "एल.आय.सी."चे जीवनविम्याचे हप्ते हे उत्पन्नाचे प्रमुख साधन राहिले आहे.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर मोकाट जनावरांचा वावर

## मुंबई गल्लीतील जुन्या सरकारी दवाखान्यासमोरील अस्वच्छतेने नागरिक त्रस्त; प्लास्टिक, कचऱ्यामुळे जनावरांच्या आरोग्यालाही धोका


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील मुंबई गल्ली परिसरात जुन्या सरकारी दवाखान्या समोर रस्त्याच्या कडेला साचलेला कचरा आणि त्यावर अन्नाच्या शोधात फिरणारी मोकाट जनावरे यामुळे स्वच्छता व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, या कचऱ्यात प्लास्टीक पिशव्या, प्लास्टिक पत्रावळी व इतर कचरा मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याने मोकाट गुराढोरांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे.

बाजारातून आणलेल्या प्लॉस्टीक पिशव्या, कार्यक्रम, घरगुती समारंभांमध्ये प्लास्टिक पत्रावळींचा सर्रास वापर केला जातो. शिळे अन्न पत्रावळी पिशव्या भरून रस्त्याच्या कडेला किंवा कचऱ्यात फेकून दिल्या जातात. अन्नाच्या वासामुळे मोकाट गायी व इतर जनावरे या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर येतात आणि खरकट्यासोबत प्लास्टिकही त्यांच्या पोटात जाण्याची शक्यता असते. व त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. एकीकडे प्लास्टिक बंदी असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते, तर दुसरीकडे बाजारात प्लास्टिकच्या प्लास्टिक पिशव्या कॅरीबॅग तसेच पत्रावळी आणि इतर साहित्य सहज उपलब्ध होत असल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी होत नसेल, तर अशा साहित्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई का होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

**तात्पुरती स्वच्छता; पुन्हा 'जैसे थे'**

मुंबई गल्लीतील ही समस्या नवीन नाही. परिसरात कचरा साचल्यानंतर अनेकदा स्वच्छता मोहीम राबवून कचरा हटविला जातो. मात्र काही दिवस उलटताच पुन्हा त्याच ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचतात आणि मोकाट जनावरांचा वावर सुरू होतो. त्यामुळे केवळ तात्पुरती साफसफाई करण्याऐवजी कचरा निर्माण होऊ नये आणि पुन्हा त्या ठिकाणी कचरा टाकला जाऊ नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी, डास-माशांचा प्रादुर्भाव आणि अस्वच्छतेचे वातावरण निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच रस्त्यावर मोकाट जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. अचानक जनावर रस्त्यावर आल्यास अपघाताचा धोका कायम आहे.



**'स्वच्छ अमळनेर'चा नारा प्रत्यक्षात कधी उतरणार?**

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी विविध उपक्रम आणि जनजागृती केली जात असली, तरी प्रत्यक्ष रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग, त्यात प्लास्टिक पत्रावळी आणि त्यावर अन्न शोधणारी जनावरे दिसत असतील तर स्वच्छता व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. नगरपालिका प्रशासनाने मुंबई गल्ली परिसरातील कचरा नियमितपणे उचलण्यासोबतच तेथे पुन्हा कचरा टाकला जाणार नाही, यासाठी ठोस उपाययोजना करावी. प्लास्टिक पत्रावळींची विक्री व वापर यावर प्रभावी नियंत्रण ठेवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून त्यांच्या सुरक्षिततेसाठीही योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## रस्त्यात शिक्षिकेची वाट अडवून लग्नाची मागणी; तरुणावर गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चोपडा रोडवरील एका मंदिराच्या रस्त्यात एका शिक्षिकेलाअडवून तिचा हात धरत 'माझ्याशी लग्न कर' अशी मागणी केल्याप्रकरणी जळोद येथील तरुणाविरुद्ध अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी दुपारी पावणेतीन वाजेच्या सुमारास घडल्याची फिर्याद आहे.

याबाबत पीडित शिक्षिकेने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या आपल्या सहकारी ममता गोविंदराव पाटील, केदार गुणवंतराव देशमुख, अतुल संजय भदाणे, रमेश बारकु धनगर व जितेंद्र दिलीप साळुंखे यांच्यासोबत मोटारसायकलीने जात होत्या. यावेळी शिक्षिका या केदार देशमुख यांच्या मोटारसायकलवर मागे बसलेल्या होत्या.

दरम्यान, जळोद येथील हिरालाल ज्ञानेश्वर रायसिंग हा मोटारसायकलवर तेथे आला. त्याने शिक्षिका व त्यांच्या सहकाऱ्यांची मोटारसायकल अडवून खाली उतरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर त्याने शिक्षिकेचा हात धरून 'तू माझ्याशी लग्न कर' असे म्हणत त्यांना अंगावर ओढल्याचा आरोप आहे.

या प्रकारानंतर शिक्षिकेने घरी जाऊन घडलेला प्रकार आपल्या आईला सांगितला. त्यानंतर अमळनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. फिर्यादीवरून हिरालाल रायसिंग याच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ७४ व १२६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हेडकॉन्स्टेबल गणेश पाटील करीत आहेत.

# रक्षाबंधनानंतर राखी कधी काढावी?

## 'या' दिवशी राखी काढणे मानले जाते अतिशय शुभ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधनानंतर राखी किती दिवस मनगटावर ठेवावी आणि ती नेमकी कधी काढावी, याबाबत अनेकांच्या मनात प्रश्न असतो. धार्मिक परंपरांनुसार राखी काढण्यासाठी वेगवेगळ्या तिथी सांगितल्या जातात. रक्षाबंधनाचा सण नुकताच उत्साहात साजरा झाला. भाऊ-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि एकमेकांप्रति असलेल्या जबाबदारीचे प्रतीक म्हणून या दिवशी बहीण भावाच्या मनगटावर राखी किंवा रक्षासूत्र बांधते. राखी बांधल्यानंतर मात्र अनेकांच्या मनात एक प्रश्न असतो ही राखी नेमकी किती दिवस हातात ठेवावी? ती कधी काढावी आणि काढल्यानंतर तिचे काय करावे?



राखी काढण्याबाबत सर्व ठिकाणी एकच नियम नाही. वेगवेगळ्या कुटुंबांमध्ये आणि प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या परंपरा आहेत. त्यामुळे याबाबत कोणताही एकच दिवस सर्वांसाठी बंधनकारक आहे, असे म्हणता येणार नाही. धार्मिक परंपरांनुसार काही दिवस राखी मनगटावर ठेवण्याची प्रथा आहे.

**राखी किती दिवस ठेवावी?**

काही धार्मिक मान्यतांनुसार रक्षाबंधनानंतर किमान २१ दिवस राखी ठेवण्याची परंपरा आहे. मात्र, २१ दिवस राखी ठेवणे शक्य नसेल, तर काही ठिकाणी जन्माष्टमीपर्यंत ती ठेवण्याची प्रथा आढळते.

त्याशिवाय काही परंपरांमध्ये श्रावण पौर्णिमेपासून भाद्रपद पौर्णिमेपर्यंत, म्हणजेच साधारण १६ दिवस रक्षासूत्र मनगटावर ठेवण्याची पद्धत सांगितली जाते. काही कुटुंबांमध्ये तर राखी दसऱ्यापर्यंत ठेवली जाते. त्यामुळे राखी कधी काढायची, हे ठरवताना आपल्या घरातील परंपरा आणि स्थानिक प्रथा लक्षात घेणे योग्य ठरते.

**राखी कधी काढणे शुभ मानले जाते?**

धार्मिक परंपरांमध्ये जन्माष्टमी आणि गणेश चतुर्थी हे दिवस राखी काढण्यासाठी शुभ मानले जातात. काही कुटुंबांमध्ये एखादा शुभ दिवस किंवा मुहूर्त पाहून रक्षासूत्र काढले जाते.

मात्र, राखी खूप सैल झाली असेल, तुटत असेल किंवा दैनंदिन काम करताना अडचण येत असेल, तर ती मनगटावर जबरदस्तीने ठेवण्याची गरज नाही. आपल्या कुटुंबाच्या परंपरेनुसार योग्य वेळी ती आदरपूर्वक काढता येते.

**राखी काढण्याची पद्धत काय?**

राखी काढताना विशेष विधी करणे आवश्यक आहे, असा सर्वमान्य नियम नाही. धार्मिक पद्धत पाळणाऱ्या व्यक्ती आपल्या सोईने एखादा शुभ दिवस निवडू शकतात. काही परंपरांमध्ये अभिजित मुहूर्तात किंवा दुपारच्या शुभ वेळी इष्टदेवाचे स्मरण करून राखी काढण्याची पद्धत आहे.

राखी हा केवळ मनगटावर बांधलेला धागा नसून, भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम आणि परस्पर जबाबदारीची आठवण करून देणारे प्रतीक मानले जाते. त्यामुळे ती काढतानाही तिच्याबद्दल आदराची भावना ठेवली जाते.

**काढलेली राखी कुठे ठेवावी?**

राखी काढल्यानंतर ती थेट कचऱ्यात फेकण्याऐवजी स्वच्छ कपड्यात गुंडाळून सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची काही कुटुंबांची परंपरा आहे. काही ठिकाणी ती पूजेच्या साहित्याबरोबर ठेवली जाते. नैसर्गिक साहित्यापासून तयार केलेली राखी असल्यास, स्थानिक परंपरेनुसार तिचे विसर्जन करण्याची पद्धतही काही ठिकाणी आढळते. मात्र, प्लास्टिक किंवा सिंथेटिक राखी नदी, तलाव किंवा इतर जलस्रोतांमध्ये सोडणे टाळावे. कारण- त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते. थोडक्यात, राखी काढण्यासाठी एकच सार्वत्रिक नियम नाही. १६ दिवस, २१ दिवस, जन्माष्टमी किंवा दसऱ्यापर्यंत राखी ठेवण्याच्या वेगवेगळ्या धार्मिक परंपरा आढळतात. त्यामुळे आपल्या कुटुंबातील प्रथा, सोय आणि स्थानिक मान्यता यांनुसार निर्णय घेणे योग्य ठरेल.

# उधना ते पुणे' व्हाया नंदुरबार-जळगाव गाडीला हिरवा कंदील..?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या उधना ते पुणे व्हाया नंदुरबार, अमळनेर, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड या प्रस्तावित रेल्वे गाडीचा मुद्दा मध्य रेल्वेच्या बैठकीत बुधवारी पुन्हा ऐरणीवर आला. जळगाव लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने हा प्रस्ताव महत्त्वाचा असल्याने या मार्गावर नवीन रेल्वे सेवा सुरू करण्याबाबत खासदार स्मिता उदय वाघ यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ठामपणे मागणी मांडली. नागपूर येथे बुधवारी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर आणि भुसावळ विभागातील खासदारांची बैठक झाली. या बैठकीला संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच नागपूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग आणि भुसावळचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल उपस्थित होते.

बैठकीत विविध मतदारसंघांतील रेल्वे विकासकामे आणि प्रवाशांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत खासदार स्मिता वाघ यांनी जळगाव लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रश्नांचा सविस्तर आढावा घेताना उधना ते पुणे व्हाया नंदुरबार, अमळनेर, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव आणि मनमाड या मार्गावर रेल्वे सेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावावर विशेष भर दिला.

**उत्तर महाराष्ट्र पुण्याशी जोडण्याची गरज**

नंदुरबार, धुळे, जळगाव आणि पुणे या दरम्यान शिक्षण, रोजगार, व्यवसाय तसेच वैद्यकीय उपचारांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रवास केला जातो. मात्र, या भागातील प्रवाशांना अनेकदा रेल्वे बदलावी लागते किंवा उपलब्ध मर्यादित सेवांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे उधना ते पुणे व्हाया नंदुरबार, अमळनेर, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड अशी थेट रेल्वे सेवा सुरू झाल्यास उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो. विशेषतः नंदुरबार, अमळनेर परिसरातील प्रवाशांसाठी पुण्याशी थेट रेल्वे जोडणी उपलब्ध होणे अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे या प्रस्तावाकडे केवळ नवीन रेल्वे गाडी म्हणून नव्हे, तर उत्तर महाराष्ट्राच्या प्रवासी वाहतुकीला नवी दिशा देणारा महत्त्वाचा पर्याय म्हणून पाहिले जात आहे.

**प्रस्तावावर मध्य रेल्वेच्या बैठकीत सकारात्मक चर्चा**



**उधना-पुणे गाडीला इंजिन बदलाचा अडथळा**

दरम्यान, उधना ते पुणे नवीन गाडी सुरू करण्याच्या प्रस्तावासमोर असलेल्या तांत्रिक अडचणींचाही बैठकीत विचार करण्यात आला. उधना ते पुणे गाडी चालविताना जळगाव येथे इंजिन बदलण्याची समस्या निर्माण होत असल्याने तिच्या संचालनाबाबत अडचणी येऊ शकतात. या पार्श्वभूमीवर अमृत भारत एक्स्प्रेसच्या माध्यमातून या मार्गाचा विचार करता येईल का, याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यामुळे प्रस्तावित रेल्वे सेवेचा मार्ग, गाडीचे स्वरूप आणि संचालनाची पद्धत याबाबत रेल्वे प्रशासनाकडून व्यवहार्य पर्याय तपासले जाण्याची शक्यता आहे. संबंधित विषयावर सकारात्मक कार्यवाही करून निश्चित कालमर्यादेत निर्णय घेण्याबाबत आवश्यक निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

**जळगावच्या रेल्वे विकासावरही चर्चा**

बैठकीत जळगाव लोकसभा मतदारसंघातील मध्य रेल्वे अंतर्गत येणाऱ्या सर्व स्थानकांच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्थानक पुनर्विकास, अमृत भारत स्थानक योजना, प्रलंबित कामे, स्थानकांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि प्रवाशांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांवरही चर्चा झाली. नवीन रेल्वे गाड्यांना थांबा देणे तसेच पूर्वीचे महत्त्वाचे थांबे नियमितपणे सुरू ठेवण्याची मागणीही खासदार वाघ यांनी केली. जळगाव लोकसभा मतदारसंघातील विविध रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन सुविधा वाढविण्याची गरज त्यांनी अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणून दिली.

## मातोश्री नगरात चोरट्याचा धिंगाणा!

पान १ वरून

शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती आहे.

**कोयता, सायकल आणि बांधकाम साहित्य**

दरम्यान, संशयिताजवळ धारदार कोयता व सायकल आढळून आल्याची माहिती आहे. त्याच्याकडे बांधकाम साहित्यही असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे घटनेचे गांभीर्य वाढले. घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलिसांना पाचारण करण्यात आले.

**विष्ठा फेकण्याची धमकी देत काढला पळ**

पोलिस येण्यापूर्वी संशयिताने 'मला संडासला जायचे आहे,' असे सांगितले. त्यानंतर त्याने तेथेच विष्ठा करून ती हातात घेत नागरिकांच्या तोंडावर फेकण्याची धमकी दिल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे नागरिक काही क्षण गोंधळले. त्याचा फायदा घेत संशयिताने तेथून पळ काढला. हेडकॉन्स्टेबल सुनील तेली व विनोद संदानशीव घटनास्थळी पोहोचेपर्यंत तो पसार झाला होता.

**पोलिसांची तत्परता; तासाभरात संशयित ताब्यात**

घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. उपलब्ध माहिती, घटनास्थळ व परिसरातील हालचालींच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा माग काढण्यास सुरुवात केली. अवघ्या तासाभरात त्याचा शोध घेऊन त्याला पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे.या कारवाईत पीएसआय शरदजी काकळीजी, हेडकॉन्स्टेबल सुनील तेली, विनोद संदानशीव यांच्यासह पोलिस पथकाने तत्परतेने काम केले. संशयित पोलिसांच्या हाती लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून पोलिसांच्या जलद कारवाईचे कौतुक केले जात आहे.

## गैरप्रकारांना पोलिसांचा दणका!

पान १ वरून : चोरून फोटो व व्हिडीओ काढून त्यांना ब्लॅकमेल करत असल्याचे प्रकारही समोर आले. या तक्रारी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या निर्दशनास आल्यानंतर त्यांनी अशा प्रकारे ब्लॅकमेल करणाऱ्या काही तरुणांना पोलिस ठाण्यात आणून समज दिली. तसेच टेकडीवर गैरप्रकार करणाऱ्या प्रेमी युगुलांनाही पोलिसी कारवाईचा इशारा देण्यात आला. हे प्रकार रोखण्यासाठी पोलीस निरीक्षक निकम यांनी नम्रता जरे, मोनाली पाटील, श्यामल पारधी या महिला पोलीस कर्मचाऱ्यांसह दामिनी पथकाला टेकडीवर नियमित गस्त घालण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे टेकडीवरील गैरप्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# कुठे आहेत दूरदर्शनचे 'श्रीकृष्ण'?

## ३३ वर्षांपूर्वी घराघरात पोहचले, आता जगताहेत साधं आयुष्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रामानंद सागर यांच्या या मालिकेत श्रीकृष्णांच्या जीवनातील वेगवेगळे टप्पे दाखवण्यात आले होते. यात युवा कृष्णाची भूमिका सर्वदमन डी. बॅनर्जी यांनी साकारली होती.






३३ वर्षांपूर्वी दूरदर्शनवर प्रसारित झालेल्या 'श्रीकृष्ण' या लोकप्रिय मालिकेत भगवान श्रीकृष्णांची भूमिका साकारून घराघरात पोहोचलेले अभिनेते सर्वदमन डी. बॅनर्जी आता मात्र प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर शांत आयुष्य जगत आहेत. 'रामायण' नंतर रामानंद सागर यांनी 'श्रीकृष्ण' ही मालिका तयार केली होती. या मालिकेत सर्वदमन डी. बॅनर्जी यांनी श्रीकृष्णांची भूमिका साकारली होती. या भूमिकेमुळे त्यांना देशभरात मोठी ओळख मिळाली. ९०च्या दशकात लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले सर्वदमन आता कुठे आहेत आणि काय करतात, हे जाणून घेऊया.

रामानंद सागर यांच्या या मालिकेत श्रीकृष्णांच्या जीवनातील वेगवेगळे टप्पे दाखवण्यात आले होते. बालकृष्णाची भूमिका अशोक बाला यांनी, तर किशोर कृष्णाची भूमिका 'रामायण'मध्ये कुशची भूमिका साकारणाऱ्या स्वप्नील जोशी यांनी केली होती. तर युवा कृष्णाची भूमिका सर्वदमन डी. बॅनर्जी यांनी साकारली होती. सर्वदमन आता मनोरंजन विश्वाच्या झगमगाटापासून पूर्णपणे दूर असून उत्तराखंडमधील ऋषिकेशमध्ये शांत आणि साधं आयुष्य जगत आहेत. येथे ते लोकांना ध्यानधारणा आणि योग शिकवतात.


**अभिनेत्याची आहे सामाजिक संस्था**

याशिवाय ते 'पंख' नावाची एक एनजीओही चालवतात. या संस्थेच्या माध्यमातून गरीब मुलांना आणि महिलांना मोफत शिक्षण देण्यासोबतच त्यांना आत्मनिर्भर बनण्यासाठी प्रशिक्षण दिलं जातं. सर्वदमन यांचं म्हणणं आहे की, आयुष्यात त्यांना जे काही हवं होतं, ते त्यांनी मिळवलं आहे. 'श्रीकृष्ण' मालिकेनंतर त्यांना शांततेच्या शोधात होते आणि समाजसेवा तसेच निसर्गाच्या जवळ राहण्यात त्यांना ती शांतता मिळाली.

कोविड-१९ लॉकडाऊनच्या काळात ही मालिका पुन्हा एकदा डीडी नॅशनलवर प्रसारित करण्यात आली होती. त्यावेळी सुरुवातीच्या काही आठवड्यांतच 'श्रीकृष्ण' मालिकेने लोकप्रियता आणि टीआरपीच्या बाबतीत 'रामायण' आणि 'महाभारत' या दोन्ही मालिकांनाही मागे टाकलं होतं.

# एका रहस्यमयी ट्रेनची कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**






एक ट्रेन प्रवासासाठी निघाली, त्यात सुमारे १०४ प्रवासी होते. ट्रेन सुरळीत सुरु झाली. प्रवासावेळी ट्रेन एका बोगद्यात शिरली, पण त्या बोगद्यातून ट्रेन बाहेर आलीच नाही. आता या घटनेला १०० वर्ष उलटून गेली आहेत. मात्र या ट्रेनचं गुपित अद्याप कायम आहे. ही घटना इटली मधील आहे. या ट्रेनसह त्यातील सर्व प्रवासी गायब झाले. या घटनेला जवळपास १०० वर्षे उलटून गेलीत, पण आजतागायत ट्रेन सापडलेली नाही, शिवाय त्यामधील प्रवाशांचा सुगावा लागलेला नाही.

१९११ मध्ये इटलीच्या झेनेटी रेल्वे कंपनीने एक नवीन ट्रेन बनवली. या ट्रेनचे डब्बे आणि इंजिन पर्यंत सर्व काही नवीन होते. कंपनीने ट्रायल म्हणून या ट्रेन मधून प्रवाशांना मोफत प्रवास करण्याची ऑफर दिली. यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांसह सुमारे १०४ जण ट्रेन मध्ये चढले. ट्रेन काही अंतरावर गेली. ट्रेनच्या प्रवासात एक बोगदा आला आणि ट्रेन बोगद्याच्या आत शिरली. ट्रेन बोगद्याच्या आत शिरली, मात्र बाहेर पडलीच नाही. सर्व प्रवाशांस बोगद्यात गेलेली ट्रेन दिसेनाशी झाली. पुढील स्टेशनवर लोक ट्रेनची वाट पाहत राहिले, पण ही ट्रेन तिथे पोहोचलीच नाही.

ट्रेन बोगद्यात घुसली, त्यावेळी दोन प्रवाशांनी त्या मधून उड्या घेतल्याचे सांगण्यात येते. ट्रेन मधून उतरलेले दोन प्रवाशी काही वेळाने बचाव पथकाला भेटले, तेव्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन प्रवाशांपैकी एका प्रवाशाने या संपूर्ण घटनेवर काहीही बोलण्यास नकार दिला. तर दुसऱ्या प्रवाशाने सांगितले की, ट्रेन बोगद्यात जाताच अचानक गायब झाली आणि तो ट्रेन मधून कसा बाहेर आला, हे त्याला स्वतःलाच काही माहित नाही.

या ट्रेनने टाईम ट्रॅव्हल केला, अशी अफवा या ट्रेन बद्दल पसरली आहे. त्यामुळे ती टाईम ट्रॅव्हल करुन बोगद्यातून गायब होऊन दुसऱ्या जगात पोहोचली, असे सांगितले जाते. मात्र, आतापर्यंत वैज्ञानिकांना बेपत्ता ट्रेनचा कोणताही सुगावा लागला नाही. मात्र काही वर्षा नंतर या ट्रेनचे काही भाग रशिया, युक्रेन आणि जर्मनीत सापडल्याचा दावा करण्यात आला. मात्र, याचा ठोस पुरावा सापडलेला नाही.

# तुम्ही पित असलेलं दूध शुद्ध आहे की, भेसळयुक्त?

## 'या' ५ चाचण्या घरीच करा आणि ओळखा भेसळयुक्त दूध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बाजारात आज दुधाचे अनेक ब्रँड्स आहेत. शिवाय अनेक जण डेअरीमधील दुधाला प्राधान्य देतात. सांगायचे झाले तर, आजच्या घडीला दूध आरोग्यासाठी फार मोठी भूमिका बाजवात आहे दूध हे एक महत्त्वाचे पोषक तत्व मानले जाते, विशेषतः मुलांच्या वाढीसाठी आणि शक्तीसाठी. पण, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) केलेल्या एका सर्वेक्षणामुळे दुधाच्या गुणवत्तेबद्दल चिंता निर्माण करण्यात येत आहे. जेव्हा देशाच्या विविध भागांतून गोळा केलेल्या दुधाच्या नमुन्यांची तपासणी केली गेली, तेव्हा जवळपास ७० टक्के नमुने गुणवत्ता मानकांमध्ये अयशस्वी ठरले. काही नमुन्यांमध्ये पाणी, स्टार्च, डिटर्जंट, युरिया आणि कृत्रिम घटकांसारखे भेसळयुक्त पदार्थ आढळून आले.

भेसळयुक्त दुधाच्या सततच्या सेवनाने दुधाचे पौष्टिक मूल्य तर कमी होतेच, पण त्यामुळे पचनाच्या समस्या, यकृत आणि मूत्रपिंडांवर होणारे परिणाम, तसेच मधुमेहींमध्ये रक्तातील साखरेच्या पातळीत होणारे चढ-उतार यांसारख्या आरोग्य समस्याही उद्भवू शकतात. पण, तुम्ही घरीच काही सोप्या चाचण्या करून तुम्ही पीत असलेले दूध शुद्ध आहे की भेसळयुक्त, हे ओळखू शकतात.

दुधातील सर्वात सामान्य भेसळ म्हणजे त्यात मिसळलेले पाणी हे ओळखण्यासाठी, काच किंवा फरशीसारख्या गुळगुळीत पृष्ठभागावर दुधाचा एक थेंब ठेवा. जर ते शुद्ध दूध असेल, तर थेंब फारसा न हलता एकाच जागी राहील. जर त्यात पाणी मिसळलेले असेल, तर तो थेंब लगेच घसरून जाईल. तसेच, त्याच्या मागे दुधाचा कोणताही दृश्यमान अंश दिसणार नाही.

काही लोक दुधाचे आकारमान आणि घट्टपणा वाढवण्यासाठी त्यात स्टार्च मिसळतात. हे तपासण्यासाठी, एका ग्लासात थोडे दूध घ्या आणि त्यात आयोडीनच्या द्रावणाचे काही थेंब टाका. जर दुधाचा रंग निळा झाला, तर याचा अर्थ त्यात स्टार्च मिसळलेला आहे. जर रंग बदलला नाही, तर दूध शुद्ध मानले जाऊ शकते.

दूध अधिक पांढरे आणि घट्ट दिसावे म्हणून त्यात कधीकधी डिटर्जंट किंवा वॉशिंग पावडर मिसळली जाते. हे आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. हे ओळखण्यासाठी, एका ग्लासात ५ ते १० मिलीलीटर दूध घ्या. तेवढंच पाणी घालून चांगले हलवा. जर वरती दाट फेस तयार होऊन तो बराच वेळ टिकून राहत असेल, तर त्यात डिटर्जंट मिसळले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. शुद्ध दुधात तयार होणारे बुडबुडे थोड्या वेळात नाहीसे होतात.

**कृत्रिम दूध कसे ओळखावे?**

रसायने, साबण आणि चुना यांसारख्या घटकांपासून बनवलेले कृत्रिम दूध आरोग्यासाठी धोकादायक असते. ते तीन प्रकारे ओळखता येते. दूध किंचित गरम करा. शुद्ध दुधाला नैसर्गिक गोड वास असतो. कृत्रिम दुधाला साबण किंवा डिटर्जंटसारखा तीव्र वास येतो. कृत्रिम दूध प्यायल्यावर किंचित कडू किंवा साबणासारखे लागते. कृत्रिम दूध उकळल्यावर नेहमीपेक्षा जास्त घट्ट दिसू शकते किंवा त्याचा रंग फिकट पिवळा होऊ शकतो. त्यामुळे दूध पिताना आणि विकत घेताना विचार करा.

# हातात आईचा फोटो घेऊन दिली 'यूपीएससी'ची मुलाखत

## पैठणच्या विश्वास झारगड यांची 'सीएपीएफ'मध्ये १४५वी रँक; कुटुंबीयांनी स्वप्नांना दिले पंख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**






बालपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. मात्र आजोबा, काका, मामा आणि दोन मोठ्या बहिणींनी दिलेल्या प्रेमाच्या आणि आधाराच्या बळावर पैठणच्या विश्वास विजय झारगड यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या(यूपीएससी) केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ) सहायक समादेशक (असिस्टंट कमांडंट) या पदावर १४५ क्रमांकाने यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे पैठण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, राष्ट्रीय स्तरावरील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विश्वास यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच या यशामुळे पैठणच्या युवकांसमोर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठे ध्येय गाठण्याचा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

मूळचे चांगतपुरी (ता. पैठण)येथील असलेले विश्वास झारगड यांनी २०२३ पासून कोल्हापूर येथील विद्या प्रबोधिनी येथे यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर मेहनत आणि ध्येयावर असलेली निष्ठा यामुळे त्यांनी अखेर स्पर्धेच्या या अत्यंत कठीण परीक्षेत यश मिळविले.

विश्वास यांची यशोगाथा केवळ एका परीक्षेत मिळविलेल्या यशाची नाही, तर ती जिद्द, संघर्ष आणि कुटुंबीयांच्या निस्वार्थ पाठबळाची कहाणी आहे. अवघ्या सहा महिन्यांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर इयत्ता तिसरीत असताना आईचेही निधन झाले. आयुष्याच्या सुरुवातीलाच आई-वडिलांचे प्रेम गमावलेल्या विश्वास यांच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली.

दिवंगत प्रा. के. पी. झारगड यांचे ते नातू असून, डॉ. भारत झारगड, पंचायत समिती सदस्य सखूबाई झारगड (काका-काकू), मामा व्यंकटेश रूपनर आणि दोन मोठ्या बहिणी डॉ. विशाखा व वृषदा यांनी विश्वास यांना आई-वडिलांची उणीव जाणवू दिली नाही. त्यांच्या शिक्षणासाठी आणि स्वप्नांसाठी कुटुंबीयांनी घेतलेले कष्ट, दिलेले प्रेम आणि प्रोत्साहन विश्वास यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. याच आधारावर त्यांनी यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेचा प्रवास यशस्वी केला. दरम्यान, "कुटुंबीयांनी माझ्यासाठी घेतलेल्या कष्टांचे आणि त्यांनी दिलेल्या प्रेमाचे आज सोने झाले आहे." या यशात कुटुंबीयांच्या त्यागाचे मोठे योगदान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**मुलाखतीवेळी आईचा फोटो सोबत**

यूपीएससी मुलाखतीसाठी गेलेल्या विश्वास यांच्या आयुष्यातील एक प्रसंग भावनिक ठरला. यूपीएससी कार्यालयाबाहेर मुलाखतीसाठी आलेले उमेदवार आयोगाच्या नावापुढे अभिमानाने फोटो काढत होते. विश्वास यांनीही त्या ठिकाणी फोटो काढला; मात्र त्यांच्या हातात स्वतःचा अभिमान मिरविण्यापेक्षा लाडक्या आईचा फोटो होता. आईचे छत्र लहानपणीच हरपले असले तरी तिच्या आठवणी आणि आशीर्वाद मनात जपत त्यांनी हे यश मिळविले. त्यामुळे विश्वास यांचा यूपीएससी निकाल हा त्यांच्या जिद्दीचा आणि मेहनतीचा विजय तर आहेच; पण त्याचबरोबर कुटुंबीयांच्या त्यागाचे आणि आईच्या अदृश्य आशीर्वादाचेही फलित मानले जात आहे.

# भारत का कर्जदार बनी पूरी दुनिया...पहली बार खिलाई चीनी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत समेत पूरी दुनिया में चीनी की मिठास ऐसी घुली हुई है कि यह सभ्यताओं और संस्कृतियों में रच-बस गई है। दुनिया में पहली बार यह चीनी तब बनी, जब गन्ने का रस रखने और उसे पकाने का पूरा इंतजाम किया होगा। दिलचस्प बात यह है कि पूरी दुनिया में गन्ने को सभ्य किसी बड़े देश ने नहीं बनाया। यह गन्ना पहले जंगली हुआ करता था, मगर इसे ग्रीनलैंड के बाद दुनिया के दूसरे सबसे बड़े द्वीप न्यू गिनी ने खोजा और इसकी बाकायदा खेती शुरू की। मगर, इससे भी ज्यादा दिलचस्प और गर्व करने वाली बात यह है कि भारत ने पूरी दुनिया को चीनी से जान-पहचान कराई। हाल ही में भारत सरकार ने विदेश से ३१ अक्टूबर तक १० लाख मीट्रिक टन कच्ची चीनी के शुल्क-मुक्त आयात की मंजूरी दी है। जानते हैं चीनी की मिठास भरी ऐतिहासिक कहानी।

**चीनी को जब कहा जाता था 'नया मसाला'**

वेबसाइट शुगर हिस्ट्री के अनुसार, दुनिया का इतिहास ऐसी खाने-पीने की चीजों से भरा पड़ा है, जिनका हमारी सभ्यताओं, विज्ञान के विकास और दुनिया की सामाजिक-आर्थिक स्थिति पर बहुत गहरा असर पड़ा। इनमें से सबसे असरदार चीजों में से एक थी चीनी। चीनी को एशिया और मध्य पूर्व का एक बहुत ही खास और महंगा 'नया मसाला' माना जाता था। इसे 'मीठा मसाला' भी कहा जाता था। दरअसल, भारत से पूरी दुनिया में मसाले जाते थे। ऐसे में चीनी की खोज के बाद इसे दुनिया के कुछ हिस्सों में मीठा मसाला भी कहा जाता था। यूरोप में इसे शुगर साल्ट कहा जाने लगा था। सबसे असरदार चीजों में से एक थी चीनी। यह एशिया और मध्य पूर्व का एक बहुत ही खास और महंगा 'नया मसाला' माना जाता था। इसे 'मीठा मसाला' भी कहा जाता था।

**भारत में ३,००० साल पहले शुरू हुई चीनी**

५०० बीसी के आस-पास यानी करीब ३,००० साल पहले

## किसी ने कहा 'मीठा मसाला' तो कोई बोला 'शुगर साल्ट'





भारत में ही सबसे पहले गन्ने के रस को उबालकर क्रिस्टल बनाने के तरीके विकसित किए गए। चीनी ने न सिर्फ हमारे खान-पान में बड़े बदलाव किए, बल्कि शुरुआती पुनर्जागरण काल में यूरोप के बड़े व्यापारिक बेड़ों के विकास और १७वीं से १९वीं सदी के बीच दुनिया भर में अफ्रीकी गुलामों के फैलाव में भी अहम भूमिका निभाई। इन्हीं वजहों से चीनी आखिरकार एक ऐसी आम चीज बन गई जिसका इस्तेमाल हर कोई करने लगा। करीब ३,००० साल पहले भारत में ही सबसे पहले गन्ने के रस को उबालकर क्रिस्टल बनाने के तरीके विकसित किए गए। चीनी ने न सिर्फ हमारे खान-पान में बड़े बदलाव किए, बल्कि शुरुआती पुनर्जागरण काल में यूरोप के बड़े व्यापारिक बेड़ों के विकास और १७वीं से १९वीं सदी के बीच दुनिया भर में अफ़्रीकी गुलामों के फैलाव में भी अहम भूमिका निभाई।

**न्यू गिनी में १० हजार साल पहले गन्ने की खेती**

शुरुआती इंसानी सभ्यताओं ने ऐसे पौधों और फलों को खोजने और उगाने की कोशिश की जिनमें सबसे ज्यादा चीनी हो। ऐसा पौधा खोजने वाली पहली सभ्यता न्यू गिनी की थी, जिन्होंने लगभग १० हजार साल पहले गन्ने की खेती शुरू की थी। इस अद्भुत पौधे के बारे में उनकी जानकारी धीरे-धीरे दक्षिण-पूर्व एशिया और दक्षिणी चीन तक पहुंची और फिर भारत आई, जहां पहली बार व्यवस्थित रूप से चीनी का उत्पादन शुरू हुआ। चीनी का पौधा खोजने वाली पहली सभ्यता न्यू गिनी की थी, जिन्होंने लगभग १० हजार साल पहले गन्ने की खेती शुरू की थी।

**भारत में गन्ने की खेती के लिए अनुकूल जलवायु**

भारत में गन्ने की खेती के लिए यहां की बेहतरीन जलवायु थी। इस वजह से यहां चीनी का इस्तेमाल कई अलग-अलग रूपों में किया जाता था। शुरू में, लोग गन्ने को चबाकर उससे मीठा रस (जिसमें सुक्रोज होता है) निकालते थे। मगर, लगभग ३५० ईस्वी में उन्होंने इसे क्रिस्टल के रूप में बदलने का तरीका खोज लिया, जिससे इसे आसानी से कहीं भी ले जाया जा सके। खासतौर पर गुप्त काल तक चीनी का इस्तेमाल होने लग गया था। भारत में गन्ने की खेती के लिए यहां की बेहतरीन जलवायु थी। इस वजह से यहां चीनी का इस्तेमाल कई अलग-अलग रूपों में किया जाता था। शुरू में, लोग गन्ने को चबाकर उससे मीठा रस (जिसमें सुक्रोज होता है) निकालते थे।

**जिन देशों के साथ कारोबार, वहां बनने लगी चीनी**

इस खास 'मीठे मसाले' के साथ, भारत ने आस-पास के देशों के साथ फायदेमंद व्यापार शुरू किया। जहां भी वे समुद्री जहाजों या जमीनी कारवां के ज़रिए मध्य पूर्व या चीन गए, वहां चीनी बनाने की जानकारी भी फैलाते गए।
इन दोनों जगहों के लोगों ने जल्दी ही चीनी के बारे में सब कुछ सीख लिया और इसे अपने खान-पान और संस्कृति में शामिल कर लिया। ६५० ईस्वी तक चीन में भी गन्ने की खेती होने लगी थी। इसके बाद से ईरान और मध्यपूर्व से होते हुए यह मुस्लिम दुनिया में फैल गई, जहां से यूरोपीयों ने इसे पूरी दुनिया में फैला दिया।

**सिकंदर के सैनिक भी भारत से ले गए चीनी**

३०० BC में सिकंदर महान और भारतीय चीनी के बीच हुई एक छोटी सी मुलाकात तब हुई, जब उसके सैनिक घर लौटते समय 'शहद जैसा पाउडर' साथ लाए थे। राचीन काल में सभ्यताओं और देशों के बनने से लेकर धर्मयुद्धों (क्रूसेड) तक यूरोप में चीनी उपलब्ध नहीं थी। उस पूरे समय में चीनी महज भारत, चीन और मध्य पूर्व में ही मिलती थी, जहां मुस्लिम रसायनशास्त्रियों ने इसके बनाने के तरीके में काफी सुधार किया था। अरब कृषि क्रांति के दौरान उन्होंने चीनी को अपने खान-पान में शामिल किया और उससे ऐसी शानदार मीठी चीज़ें बनाईं जिन्हें चखने वाला हर कोई पसंद करता था।




# भगवान विष्णूंनी मध्यरात्री का घेतला श्रीकृष्ण अवतार


## जाणून घ्या जन्माष्टमीच्या व्रताची कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला हिंदू धर्मातील लोकप्रिय सण जन्माष्टमी हा सण पूर्ण भक्तीभावाने साजरा केला जात आहे. या तिथीच्या मध्यरात्री रोहिणी नक्षत्रात भगवान श्रीकृष्णांचा जन्म झाला. जन्माष्टमीच्या कथेत जाणून घेऊया भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म कसा झाला आणि भगवान विष्णू यांनी मध्यरात्री भगवान श्री कृष्णांचा अवतार का घेतला?

द्वापर कालखंडात मथुरेत कंस नावाचा राजा राज्य करत होता, तो अतिशय अत्याचारी होता. आपला पिता राजा उग्रसेन याला पदच्युत करून तो स्वतः राजा झाला. त्याला देवकी नावाची एक बहीण होती, जिचा विवाह यदु वंशाचा नेता वासुदेव यांच्याशी झाला होता. एके दिवशी कंस आपली बहीण देवकीला घेऊन सासरच्या घरी जात होता.

प्रवासादरम्यान आकाशातून वाणी आली, “हे कंसा, तुझा मृत्यू देवकीच्या बहिणीमध्ये आहे जिला तू अत्यंत प्रेमाने नेत आहेस. तिच्या पोटी जन्मलेला आठवा मुलगा तुझा नाश करील.” हे ऐकून कंस विचार करू लागला. मग तो वासुदेवजींना मारायला तयार झाला. तेवढ्यात देवकीने त्याला विनवणी केली आणि म्हणाली, “भाऊ, तुझ्या मृत्यूमध्ये माझ्या पतीचा काय दोष? आपल्या मेव्हण्याला मारून काय फायदा? मी वचन देते की माझ्या पोटी जन्माला आलेला मुलगा मी तुझ्या हाती देईन. त्याने वासुदेव आणि देवकीला तुरुंगात टाकले. वासुदेव आणि देवकी यांना एक एक करून सात मुले झाली. देवकीने आपले वचन पाळले. बाळांचा जन्म होताच तिने सातही कंसाच्या स्वाधीन केले, ज्याने त्यांचा वध केला. आठव्या बाळाचा जन्म होणार होता तेव्हा कंसाने तुरुंगात आणखी कडक पहारेकरी बसवले. दुसरीकडे क्षीरसागरातील शेषशैयावर विराजमान झालेल्या भगवान विष्णूंनी वासुदेव-देवकीचे दुःखी जीवन पाहून आठव्या अपत्याचे रक्षण करण्याचा मार्ग काढला आणि आठव्या अवताराची तयारी केली. मथुरेजवळील गोकुळातील यदुवंशी सरदार आणि



वासुदेवजींचे मित्र नंद यांची पत्नी यशोदा यांनाही मूल होणार होते. ज्या वेळी वासुदेव-देवकीला पुत्र झाला, त्याच वेळी भगवान विष्णूंच्या आज्ञेवरून योगमायेचा जन्म यशोदेच्या पोटी कन्या म्हणून झाला. देवकी-वासुदेव ज्या कोठडीत बंदिस्त होते त्या कोठडीत अचानक प्रकाश पडला आणि त्यांच्यासमोर शंख, चक्र, गदा आणि कमळ धारण केलेले एक चतुर्भुज भगवान प्रकट झाले. देवकी-वासुदेव परमेश्वराच्या चरणी पडले. तेव्हा भगवान वासुदेवजींना म्हणाले, “मी तुम्हा दोघांचा पुत्र म्हणून अवतार घेणार आहे. मी अर्भकाच्या रूपात जन्माला येताच, तू मला ताबडतोब वृंदावनला तुझ्या मित्र नंदजीच्या घरी घेऊन जाशील आणि तिथे एक मुलगी झाली आहे आणि तिला कंसाच्या स्वाधीन करशील. येथील परिस्थिती आपल्यासाठी अनुकूल नाही. पण काळजी करू नका. पहारेकरी झोपी जातील, तुरुंगाचे दरवाजे आपोआप उघडतील आणि चिघळणारी यमुना तुम्हाला ओलांडण्याचा मार्ग देईल." त्याच वेळी नवजात अर्भक श्रीकृष्ण यांना एका मोठ्या पेटीत ठेवून वासुदेवजी तुरुंगातून बाहेर पडले आणि अथांग यमुना पार करून नंदजींच्या घरी पोहोचले. तेथे त्यांनी नवजात बाळाला यशोदेकडे झोपवले आणि मुलीसह मथुरेला आले. तुरुंगाचे दरवाजे पूर्वीप्रमाणे बंद झाले.

वासुदेव आणि देवकीला मूल झाल्याची बातमी कंसाला मिळाल्यावर तो कारागृहात गेला आणि त्याने देवकीच्या हातातून नवजात मुलगी हिसकावून तिला पृथ्वीवर फेकण्याचा प्रयत्न केला, पण मुलगी आकाशात उडून गेली आणि तिथून म्हणाली - "हे मूर्ख कंसा ! मला मारून काय होईल? जो तुला मारेल तो गोकुळात पोहोचला आहे. तो लवकरच तुझ्या पापांची शिक्षा देईल.”

### भगवान श्रीकृष्णांचा जन्म मध्यरात्री का झाला?

द्वापार युगात श्रीकृष्णांचा जन्म रोहिणी नक्षत्रात झाला. याचे कारण त्यांचे चंद्रवंशी असणे. पुराण आणि धार्मिक ग्रंथानुसार श्रीकृष्ण चंद्रवंशी होते. त्यांचे पूर्वज चंद्रदेवांशी संबंधित होते. रोहिणी ही चंद्राची पत्नी आणि स्वतःचे नक्षत्र आहे. यासाठी भगवान श्रीकृष्णांचा जन्म रोहिणी नक्षत्रात झाला. तर अष्टमी तिथी शक्तीचे प्रतीक मानली जाते. माझ्या कुळात श्री हरी विष्णूंनी कृष्णांच्या रूपात जन्म घ्यावा, अशी चंद्रदेवाची इच्छा होती, अशीही एक धारणा आहे. सर्वात महत्वाची वस्तुस्थिती अशी आहे की श्रावण महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या अष्टमीच्या मध्यरात्री, तो शुभ काळ तयार होत होता, जेव्हा भगवान विष्णू ६४ कलांमध्ये पारंगत, भगवान श्रीकृष्ण म्हणून जन्म घेऊ शकत होते.



## गोकुळाष्टमीला बाळकृष्णांचा जन्म काकडीतून का करतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मशास्त्रानुसार, भाद्रपद महिन्यात कृष्ण पक्षाच्या आठव्या दिवशी गोकुळाष्टमी साजरी केली जाते. त्यानुसार, आज रात्री ठीक १२ वाजता गोकुळाष्टमी साजरी केली जाणार आहे. गोकुळाष्टमी हा भगवान विष्णूंचा आठवा अवतार असलेल्या भगवान श्रीकृष्ण यांचा जन्मदिवस आहे. यंदा पंचांगानुसार गोकुळाष्टमी ४ सप्टेंबर रोजी साजरी केली जाणार आहे. पण श्रीकृष्णाचा जन्मदिन साजरा करताना अनेक घरांमध्ये बाळकृष्णाची मूर्ती एका मोठ्या काकडीत (काकडीच्या पोटात) का ठेवली जाते? यामागे नेमकी कोणती परंपरा आहे हे अनेकांना माहीत नसतं. याच संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊया.

**गोकुळाष्टमीला बाळकृष्णांचा जन्म काकडीतून का करतात?**

शास्त्रानुसार, काकडीतून भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म घडवून आणण्याच्या या प्रक्रियेला 'नाल छेदन' म्हणतात. काकडीला मातेचा गर्भ मानले जाते आणि रात्री बरोबर १२ वाजता काकडीचा देठ नाण्याने कापून (नाळ कापल्याप्रमाणे) बाळकृष्ण यांना बाहेर काढले जाते. असे केल्याने बाळकृष्ण यांचा प्रत्यक्ष जन्म आपल्या घरात झाला अशी मान्यता आहे. यामुळे घरात अपार सुख, समृद्धी आणि संतती सुख प्राप्त होते.

काकडीशिवाय भगवान श्रीकृष्ण यांची पूजा अपूर्ण मानली जाते. भगवान श्रीकृष्ण गोकुळाष्टमीच्या दिवशी अशा प्रकारे काकडी देवाला अर्पण करा. तसेच, रात्री या काकडीला चमचा किंवा नाण्याच्या सहाय्याने काकडीच्या मध्यभागी कापा. यामध्ये चाकूचा, सुरीचा वापर करायचा नाही. त्यानंतर भगवान श्रीकृष्ण यांच्या मूर्तीला काकडीच्या मध्यभागी झाकून ठेवा. रात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्ण यांचा जन्मदिन साजरा करावा. तसेच, पुढच्या दिवशी ही काकडी ज्या महिलेला संतती प्राप्ती हवी त्यांना ती खाऊ घाला. मान्यतेनुसार, असे केल्यास संतान प्राप्तीमध्ये येणारे अडथळे दूर होतात.

## भगवान श्रीकृष्णांच्या प्रिय ५ राशींना इच्छापूर्तीचे संकेत!

### यंदा जन्माष्टमी सुवर्णकाळ घेऊन येतेय, प्रगतीच्या नवनवीन संधी, पैसा, नोकरी, ज्योतिषशास्त्र...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार पाहायला गेलं तर, प्रत्येक राशीचा एक संरक्षक देवता असतो आणि या राशीच्या लोकांवर वेगवेगळ्या देव-देवतांचा विशेष आशीर्वाद असतो. जन्माष्टमीच्या पार्श्वभूमावर सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे, या निमित्ताने आपण जाणून घेणार आहोत ते भगवान श्रीकृष्णांच्या आवडत्या राशींबद्दल, ज्यांचे नशीब येत्या जन्माष्टमीपासून चमकणार आहे, भगवान श्रीकृष्णांचा आशीर्वाद सर्व राशींना मिळत असला तरी, ज्योतिषशास्त्रानुसार, अशा पाच राशी आहेत, ज्यांचा सुवर्णकाळ जन्माष्टमीने सुरू होणार आहे. ज्योतिषशास्त्रात याबाबत नेमकं काय म्हटलंय..

सर्व लोक भगवान श्रीकृष्णांची विशेष पूजा करतात आणि त्यांचे आशीर्वाद घेतात. परंतु काही राशी अशा आहेत, ज्यांच्यावर भगवान श्रीकृष्णांची नेहमीच कृपा असते.

**वृषभ :** वृषभ ही भगवान श्रीकृष्णांची राशी आहे आणि तिचा स्वामी शुक्र ग्रह आहे, जो भौतिक सुखांचा ग्रह आहे. यामुळे, वृषभ राशीच्या लोकांना भगवान श्रीकृष्णांचा आशीर्वाद लाभतो. वृषभ राशीत जन्मलेल्यांना प्रत्येक पावलावर भाग्य लाभेल आणि अनेक संकटांपासून त्यांची सुटका होईल. वृषभ राशीत जन्मलेल्यांनी जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्ण यांना दही आणि खडीसाखर यांसारख्या पांढऱ्या वस्तू अर्पण कराव्यात आणि दानधर्मही करावा.

**सिंह :** सिंह राशीचा स्वामी सूर्य आहे, जो ग्रहांचा राजा आहे, आणि सूर्याला भगवान नारायणांचा अवतार देखील मानले जाते, म्हणून सिंह राशीच्या लोकांना भगवान कृष्णांचा आशीर्वाद लाभलेला असतो. कृष्णांच्या आशीर्वादाने, सिंह राशीच्या लोकांना प्रत्येक क्षेत्रात लाभ मिळेल आणि त्यांची बुद्धी वाढेल. नोकरी आणि व्यवसायात असलेल्यांनाही या राशीचा फायदा होईल आणि धन व संपत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. सिंह राशीच्या लोकांनी जन्माष्टमीला भगवान कृष्ण यांना पिवळे वस्त्र अर्पण करावे.

**तूळ :** तूळ राशीचा स्वामी शुक्र ग्रह आहे, जो समृद्धी आणि ऐश्वर्याचा ग्रह आहे. तूळ राशीच्या लोकांना भगवान कृष्णांचा आशीर्वाद लाभलेला असतो, जो त्यांना सर्व दुखे आणि त्रासांपासून दूर ठेवतो. तूळ राशीचे लोक कृष्णांचे परम भक्त असतात आणि ही भक्ती त्यांना आव्हानांवर मात करण्याची शक्ती देते. कृष्णांच्या कृपेमुळे, तूळ राशीच्या लोकांना कधीही धन आणि समृद्धीची कमतरता भासत नाही, म्हणून तूळ राशीच्या लोकांनी कान्हाजी पंचामृत अर्पण करावे.

**धनु :** धनु राशीचा स्वामी गुरु ग्रह आहे आणि या राशीवर नेहमी कृष्णांचा आशीर्वाद असतो. कृष्णांच्या कृपेमुळे, धनु राशीच्या लोकांकडे ज्ञानाची कमतरता नसते आणि ते या ज्ञानाने अनेक लोकांना मदत करतात. कृष्णांच्या आशीर्वादाने, धनु राशीच्या लोकांच्या आदर आणि सन्मानात लक्षणीय वाढ होते आणि ते दानधर्माच्या कार्यात सक्रियपणे सहभागी होतात. धनु राशीच्या लोकांनी जन्माष्टमीला उपवास करावा आणि मध्यरात्री चंद्राची प्रार्थना करून कृष्ण जागरण करावे.

**मीन :** मीन राशीचा स्वामी गुरु ग्रह आहे आणि वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार, गुरु भाग्य, ज्ञान आणि समृद्धीचे प्रतीक आहे. मीन राशीच्या लोकांवर नेहमी भगवान कृष्णांचा आशीर्वाद असतो आणि ते धार्मिक कार्यात खोलवर गुंतलेले असतात. मीन राशीच्या लोकांना जीवनात कधीही कशाचीही कमतरता भासत नाही आणि या राशीत जन्मलेले विद्यार्थी चांगले शैक्षणिक यश मिळवतात.

## घरीच कसा साजरा करावा कृष्णजन्मोत्सव?

### जाणून घ्या शुभ मुहूर्त, पूजा विधी आणि नियम!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी हा हिंदू धर्मातील प्रमुख सणांपैकी एक आहे. या सणाची भक्त वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात. जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्ण यांच्या बालरूपाची पूजा केली जाते. मध्यरात्री कृष्ण यांचा जन्मसोहळा साजरा करून त्यांना नैवेद्य दाखवला जातो आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली जाते. धार्मिक मान्यतेनुसार, भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला, रोहिणी नक्षत्रात मध्यरात्री झाला होता. त्यामुळे जन्माष्टमीला मध्यरात्री पूजा केली जाते. तसेच अष्टमी तिथी आणि रोहिणी नक्षत्राचा संयोग शुभ मानला जातो. या शुभ मुहूर्तावर विधीपूर्वक श्रीकृष्ण यांची पूजा केल्याने घरात सुख-समृद्धी नांदते आणि रखडलेली कामे पूर्ण होण्यास मदत होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. तर यावर्षी ४ सप्टेंबर २०२६ रोजी जन्माष्टमी साजरी केली जाणार आहे. चला तर मग, जाणून घेऊया जन्माष्टमीचे महत्त्व, पूजा विधी आणि शुभ मुहूर्त....

**भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी २०२६ शुभ योग**

यावर्षी भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला ४ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे २ वाजून २५ मिनिटांनी सुरू होईल. ही तिथी ५ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजून १३ मिनिटांनी संपेल. तारखेनुसार, भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी साजरी केली जाईल. याव्यतिरिक्त यादिवशी मध्यरात्री अष्टमी तिथी, रोहिणी नक्षत्र आणि वृषभ राशीतील चंद्र यांचा विशेष संयोग पाहायला मिळणार आहे.

**शुभ मुहूर्त**

भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या पूजेसाठी शुभ मुहूर्त ४ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजून ५७ मिनिटांनी सुरु होईल ते ५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजून ४३ मिनिटांपर्यंत असणार आहे. या काळात तुम्ही लाडू गोपाल यांची पूजा करू शकता.

जन्माष्टमी पूजा विधी

**१. घर आणि देवघराची स्वच्छता**

जन्माष्टमीच्या दिवशी सकाळी घर आणि देवघर स्वच्छ करून घ्या. देवघरात सुंदर रांगोळी काढून भगवान श्रीकृष्ण यांची मूर्ती किंवा बाळकृष्ण यांची मूर्ती सजवा.

**२. बाळकृष्णांना सजवा**

बाळकृष्णांना नवीन वस्त्र, दागिने, मोरपिस आणि फुलांची माळ घाला. शक्य असल्यास छोटासा पाळणा सजवा आणि त्यात बाळकृष्णांची मूर्ती ठेवा.

**३. नैवेद्य**

महाराष्ट्रात जन्माष्टमीला दही, दूध, लोणी, साखर, पोहे, फळे यांसह घरच्या पद्धतीचे गोड पदार्थ नैवेद्याला ठेवले जातात. काही घरांमध्ये गोपाळकाला किंवा दहीहंडीशी संबंधित पदार्थही केले जातात.

**४. उपवास**

काही भक्त उपवास करतात. काही जण पूर्ण उपवास करतात, तर काही फलाहार करतात. आरोग्याच्या कारणास्तव उपवास करणे शक्य नसल्यास साधा सात्त्विक आहार घेऊ शकता.

**५. भगवान श्रीकृष्ण यांचा जन्माचा सोहळा**

जन्माष्टमीच्या रात्री मध्यरात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म साजरा करण्याची परंपरा आहे. त्या वेळी बाळकृष्णांची पूजा करून आरती केली जाते.

**६. अभिषेक**

बाळकृष्णांच्या मूर्तीवर दूध, दही, तूप, मध आणि साखर यांचा पंचामृत अभिषेक करण्याची प्रथा काही घरांमध्ये आहे. त्यानंतर स्वच्छ पाण्याने मूर्ती धुऊन नवीन वस्त्र घालतात.

**७. पूजा आणि आरती**

बाळकृष्णांला फुले, तुळशीची पाने आणि नैवेद्य अर्पण करा.

**८. पाळणा**

मध्यरात्री कृष्णजन्म झाल्यानंतर बाळकृष्ण यांना पाळण्यात ठेवून पाळणा म्हणण्याची महाराष्ट्रात सुंदर परंपरा आहे. कुटुंबातील सर्वजण पाळणा हलवून कृष्णजन्माचा आनंद साजरा करतात.

**९. प्रसाद**

पूजा आणि आरती झाल्यानंतर नैवेद्याचा प्रसाद सर्वांना वाटला जातो. त्यानंतर घरच्या परंपरेनुसार उपवास सोडला जातो.

## भगवान श्रीकृष्ण यांची कृपा मिळवण्यासाठी जन्माष्टमीला बालगोपालांसमोर ठेवा ‘या’ वस्तू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान श्रीकृष्ण यांना दही आणि लोणी किती प्रिय आहेत हे सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांना प्रसन्न करण्यासाठी माखन मिश्री म्हणजेच लोण्याचा आणि गोपाळकाला याचा नैवेद्य दाखवला जातो. तसेच भगवान श्रीकृष्ण यांना आपली बासरी देखील तितकीच प्रिय असल्याने अनेकजण त्यांना मंदिरात जाऊन बासरी व मोरपंख अर्पण करतात. मात्र यंदा जन्माष्टमीच्या दिवशी जर तुम्ही भगवान श्रीकृष्णांसमोर काही वस्तू ठेवल्या किंवा त्यांना अर्पण केल्या तर भगवान कृष्णांची तुमच्यावर कृपा होऊन घरात सुख शांती आणि भरभराट होऊ शकते असे मानले जाते. पाहुयात कोणत्या आहेत या वस्तू.

### बासरी आणि मोरपंख

बासरी आणि मोरपंख यादोन्ही गोष्टी भगवान श्रीकृष्ण यांना अत्यंत प्रिय आहेत. राधाराणीला बोलावण्यासाठी भगवान श्रीकृष्ण बासरीच वाजवायचे तसेच त्यांच्या डोक्यावरील मोरपंख कान्हाचे रूप अधिक खुलवायचे त्यामुळे यादोन्ही गोष्टी भगवान श्रीकृष्ण यांच्या सौंदर्यात आणि शृंगारात चार चांद लावतात व त्यांना या गोष्टी प्रिय असल्याने भगवान श्रीकृष्ण यांना प्रसन्न करण्यासाठी मोरपंख आणि बासरी कायम त्यांना अर्पण करावे.

### तुळस

भगवान श्रीकृष्ण यांच्या कोणत्याही नैवेद्य किंवा प्रसादात तुळशीची पाने घेणे अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. शास्त्रानुसार, तुळशीशिवाय बाळ गोपाल त्यांचा भोग स्वीकारत नाहीत. अशा परिस्थितीत जन्माष्टमीच्या दिवशी जेव्हा तुम्ही तुमच्या



लड्डू गोपालांसमोर भोग ठेवता, तेव्हा प्रत्येक गोष्टीत तुळशीची पाने ठेवल्याने भगवान श्रीकृष्ण नक्की प्रसन्न होतील.

### चांदीचे पैंजण

भगवान श्रीकृष्ण यांच्या समोर तुम्ही चांदीचे पैंजण किंवा चांदीची माळ त्यांना अर्पण करू शकता. चांदी हा शुभ धातू तसेच चंद्राशी संबंधित मानला जातो. यामुळे भगवान श्रीकृष्ण यांना चांदी आपल्या क्षमतेनुसार अर्पण केल्यास कान्हजी प्रसन्न होऊन आपल्याला शुभफळ देतात असे मानले जाते.

### वैजयंतीची फुले

वैजयंतीच्या फुलांनी बनवलेली माळ भगवान श्रीकृष्ण यांना खूप प्रिय आहे. ही माळ बनवून तुम्ही जन्माष्टमीला भगवान श्रीकृष्ण यांना घालू शकता. ही माळ परिधान करणे शुभ मानले जाते. ही फुले घरातून नकारात्मक ऊर्जा काढून टाकतात आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण करतात.

### कामधेनू गाय

भगवान श्रीकृष्ण यांचा गायींशी सखोल संबंध होता हे आपण सर्वजण जाणतो. भगवान श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसोबत गाईंना घेऊन वनात चायचे. त्यांचा गाईंशी जिव्हाळ्याचे नाते होते. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांना तुम्ही कामधेनू गाय म्हणजेच गाय वासराची जोडी असलेली मूर्ती अर्पण केली तर तुमचे आयुष्य बदलू शकते. जीवनात सकारात्मकता येऊन तुमच्या मुलांना देखील यश मिळेल असे मानले जाते.

### चंदन, केशर आणि अक्षता

जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्ण यांना चंदन, केशर आणि अक्षता लावून सजवणे खूप शुभ मानले जाते. तसेच केशर आणि अक्षता भगवान श्रीकृष्ण यांना अर्पण केल्या पाहिजेत. यामुळे तुमच्या घरात आनंद आणि शांतीचे वातावरण निर्माण होईल.

### झोपाळा

जन्माष्टमीच्या रात्री भगवान श्रीकृष्ण यांना सुंदर सजवलेल्या झोपाळ्यावर झूलवले पाहिजे. त्यामुळे यादिवशी प्रामुख्याने तुम्ही भगवान श्रीकृष्ण यांना सुंदर पाळणा भेट देऊ शकता किंवा मंदिरात जाऊन अर्पण करू शकता यामुळे भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होतात व तुम्हाला आयुष्यात अनेक प्रकारे लाभ मिळू लागतात असे मानले जाते.

### शंख

जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्ण यांच्या समोर एक छोटासा शंख ठेवला पाहिजे. तसेच भगवान श्रीकृष्ण यांचा पाणी किंवा पंचामृताने अभिषेक केला जातो. असे मानले जाते की पूजेत शंख असणे हे घरातील सर्वात मोठे वास्तु दोष नष्ट करू शकते. शंखाचा आवाज घरात आजूबाजूचे वातावरण शुद्ध, शांत आणि सकारात्मक ठेवतो.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**